नि.दि.दा. क्र. ८१/२०२२
अनिल व इतर वि. प्रभाकरराव
**CNR No.MHWS080011372022**

## <u>निशाणी क्र. २० खाली आदेश</u>
## (पारित दिनांक २७.०३.२०२३)

मुळ वादींनी सदरचा अर्ज त्यांच्याविरुध्द झालेला विनाजवाब आदेश रद्द होणेबाबत दाखल केला आहे. त्यांचे कथनानुसार, प्रस्तुतचे प्रकरण वि. न्यायालयात प्रलंबित असून प्रतिवादी यांनी मुळवादीच्या कायमस्वरुपी मनाईहुकूम मिळणेबाबतच्या दाव्यात प्रतिदावा आणि तात्पुरता मनाईहुकूम मिळणेबाबतच्या अर्जात प्रतिअर्ज दाखल केलेला आहे. सदर प्रतिदाव्यात मुळवादींनी लेखी जवाब दाखल न केल्याने दिनांक ०३.०२.२०२३ रोजी त्यांच्याविरुध्द विनाजवाब आदेश पारीत झाला. मुळवादी हे त्यांच्या सासुंना घेऊन औरंगाबाद येथील दवाखान्यात गेले असल्याने ते प्रतिदाव्यात लेखी जवाब दाखल करुन शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रतिदाव्यात झालेला विनाजवाब आदेश खारीज होणे गरजेचे आहे. असे न झाल्यास न्यायोचित न्यायनिवाडा करणे होणार नसल्याने मुळवादींनी प्रतिदाव्यास लेखी जवाब व उत्तर दाखल करण्यास परवानगी मागून विनंती केली आहे.

<u>०२</u> मुळप्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादीच्या वकीलांनी म्हणणे दाखल केले की, लेखीजवाब हा मुदतीत दाख न केल्यामुळे मुळ वादींचा सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. तसेच अर्ज मंजूर केल्यास खर्च लावण्याची विनंती केली.

<u>०३</u> दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मुळ वादींनी कायमचा मनाईहुकूम मिळणेबाबत दिनांक १६.०७.२०२२ रोजी दाखल केला. त्याच दिवशी तात्पुरता मनाईहुकूमाचा अर्ज सुध्दा दाखल केला होता. त्यानंतर मुळ प्रतिवादीला समन्सची तामिली होऊन तो दिनांक २१.०८.२०२२ रोजी नि.क्र. ०९ नुसार हजर होऊन नि.क्र. १० नुसार लेखीजवाब दाखल करण्यास वेळ मागितला. त्यानंतर दिनांक ०३.११.२०२२ रोजी मुळ प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादीने नि.क्र. १४ नुसार लेखीजवाब व प्रतिदावा दाखल केला. त्याचदिवशी नि.क्र. १५ नुसार तात्पुरता मनाईहुकुमाचा अर्ज सुध्दा दाखल केला.

<u>०४</u> मुळ वादींना प्रतिदाव्यास व तात्पुरता मनाईहुकुमाच्या अर्जास म्हणणे दाखल करण्यास नि.क्र. १६ व १७ नुसार वेळ देण्यात आला होता. परंतु मुळवादींनी प्रतिदाव्यास म्हणणे दाखल न केल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक ०३.०२.२०२३ रोजी नि.क्र. ०१ वर

विनाजवाब आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर मुळवादींनी दिनांक २०.०३.२०२३ रोजी नि.क्र. २० नुसार सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**<u>०५</u>** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मुळ प्रतिवादीने दिनांक दिनांक ०३.११.२०२२ रोजी मुळ प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादीने नि.क्र. १४ नुसार लेखीजवाब व प्रतिदावा दाखल केला. मुळ वादींनी दिनांक २०.०३.२०२३ रोजी सदरचा अर्ज दाखल करुन प्रतिदाव्यास लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी मागितली आहे. मुळ प्रतिवादीने प्रकरणात प्रतिदावा दाखल केल्याचा दिनांक बघता ९० दिवसांचा कालावधी अगोदरच उलटून गेला आहे. मुळ वादींविरुध्द सदर अर्जासोबत प्रतिदाव्यास लेखी जवाबदावा व तात्पुरत्या मनाईहुकुमास उत्तर दाखल केलेले दिसून येते. तसेच मुळवादींनी साक्षीदारांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सुध्दा दाखल केलेले दिसून येते. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. मुळवादी/ प्रतिदाव्यातील प्रतिवादींचा अर्ज १००/– रुपये खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. मुळ प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादीला अर्जाचा खर्च अदा केल्यानंतर मुळवादींचा जवाब दावा अभिलेखावर घेण्यात यावा.

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2023.03.27 18:01:18 +0530

( यो.द. कोईनकर)

दिनांकः २७.०३.२०२३

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 27.03.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 27.03.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 27.03.2023 |